दैनिक अजिंक्य भारत
12 Aug 2024 - Page 13

# शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षा कार्यशाळा



**अकोट दि. ११ प्रतिनिधी**

स्थानिक शिवाजी कनिष्ट महाविद्यालय अंजनगाव रोड अकोट येथे नुकतीच सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील सुमित संजय सपकाळ, व अनिकेत विजय भुडके या सायबर वॉरियर्स नी ऑनलाईन फसवणूक, वाढता सोशियल मिडीयाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाईन खरेदी,नवनवीन मोबाईल मध्ये येणारे ऐप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेबसाईटस कशा ओळखाव्या या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

ही कार्यशाळा क्विक हिल फाऊनडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबु आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कार्यशाळेचे अध्यक्ष, मुख्याध्यापक वालसिंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षिका अंजली सपकाळ , शिक्षक चौधरी, हिंगनकर व सर्व शाळेचे विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.